Indian Streams Research Journal
ISSN: 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 11 | December - 2016

# "माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक वातावरणाचा अभ्यास"

डॉ. अजय मधुकरराव गडम
सहाय्यक प्राध्यापक , गणवंतराव देशमुख शिक्षण महाविद्यालय, पुसद जि. यवतमाळ.

**सारांश**
प्रस्तुत संशोधनामध्ये माध्यमिक स्तरावरील इयत्ता ९ वी मध्ये शिकत असलेल्या ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या कौटुंबिक वातावरणाचा अभ्यास करण्यात आलेला आहे. त्यासाठी यवतमाळ जिल्ह्यातून एकुण ४०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे त्यामध्ये ग्रामीण भागातील २०० व शहरी भागातील २०० विद्यार्थ्यांचा समावेश आहे. संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे या संशोधन विषयाशी संबंधित विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक वातावरणाशी संबंधित माहितीचे संकलन करण्यासाठी शाह बिना यांनी विकसित व प्रमाणीत केलेल्या कौटुंबिक वातावरण मापणीचा वापर करण्यात आलेला आहे. सांख्यिकीय विश्लेषणासाठी शेकडेवारी पध्दती, प्रसार, मध्यमान, प्रमाण विचलन आणि टी परिक्षण या सांख्यिकीय प्रविधीचा वापर करण्यात आला. प्रस्तुत संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आले की, शहरी भागातील विद्यार्थ्यांचे कौटुंबिक वातावरण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत अधिक प्रभावी आहे तसेच ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थी आणि विद्यार्थीनींच्या कौटुंबिक



वातावरणामध्ये सार्थक फरक दिसुन येत नाही.

**प्रस्तावना :**
विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण विकासासाठी अनुकूल वातावरण निर्मिती करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण अनुकूल वातावरण विद्यार्थ्यांना चारित्र्यवान आणि योग्य बनविण्यास प्रेरणादायी ठरत असते. विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी अशा वातावरणाची गरज असते. ज्याच्या माध्यमातून विद्यार्थी आपल्या सर्व गुणांचे विकसन करुन त्याला स्वाभाविक स्वरुपात अस्तित्वात आणू शकेल.
वातावरणामध्ये प्रामुख्याने नैतिक, सामाजिक, शारीरिक आणि बौद्धिक तसेच मानसिक परिस्थितीचा अंतर्भाव आढळून येतो, जो व्यक्तीच्या जीवनावर प्रभाव पाडण्याचे कार्य करीत असतो. वातावरणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची शारीरिक आणि मनोवैज्ञानिक अभिवृद्धी व विकास घडून येण्यास मदत होते.

**कौटुंबिक वातावरण संकल्पनात्मक रूपरेखा :**
"व्यक्ती कुटुंबातच जन्माला येते. तिची आंतरक्रियाही कुटुंबातील व्यक्तीशीच प्रथम घडते कुटुंबातूनच ती शिक्षणास प्रारंभ करते व अंतही तिचा कुटुंबातच होतो. त्यामुळे व्यक्तीच्या जीवनात येणारी ही पहिली शिक्षण संस्था आहे. म्हणूनच कुटुंबाला प्राथमिक सामाजिक संस्था असे म्हणतात. प्रारंभीक अवस्थेमध्ये कुटुंबातील वातावरण हे मुलांच्या विकासाला प्रभावीत करीत असते वास्तविकता तेथुनच त्यांच्या प्रारंभीक शिक्षणाची सुरवात होते या ठिकाणचे वातावरण मुलांच्या भावी शैक्षणिक विकासाला प्रोत्साहीत करत असल्याचे बहुतांश अध्ययनावरून स्पष्ट झालेले आहे. कौटुंबिक वातावरण हे मूलांच्या शैशवावस्था व बाल्यावस्थेतील विकासाला योग्य संस्कार देणे, शारीरिक, भावनिक, मानसिक, विकासासोबतच सामाजिक जीवनाला पोषक असे वातावरण म्हणजे कौटुंबिक वातावरण होय.
घरात आई वडिलांना मिळणारे प्रेम व वात्सल्य त्यांच्या भावात्मक विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरते. ज्या पालकाचे वर्तन भावशून्य असते. अशा सर्व प्रकारच्या शिस्तीबरोबर मूलांना योग्य त्या प्रमाणात प्रेमही मिळाले पाहिजे. आणि मूलांच्या मनात त्यांच्या प्रेमाबद्दल योग्य तो विश्वासही जागृती झाला पाहिजे. असे ज्या कुटुंबात होते त्या कुटुंबात मूलांच्या सर्वांगीण विकासासाठी अनुकूलता निर्माण होते. थोडक्यात, आई वडिलांचे आणि मुलांचे संबंध परस्पर स्नेहाचे व प्रेमाचे असतील तर मूलांना योग्य ते वळण लागून त्यांचा योग्य दिशेने विकास होण्याची शक्यता असते, म्हणूनच कौटुंबिक वातावरण विकासाच्या दृष्टीने चांगले असणे आवश्यक आहे.

**संशोधनाचे महत्व :**
वर्तमान व्यवस्थेमध्ये मुलांना प्राप्त होणाऱ्या कौटुंबिक वातावरणाला महत्वपूर्ण स्थान

प्राप्त झालेले आहे. पालकांच्या मुलांच्या संदर्भात असलेल्या मोठया प्रमाणावरील अपेक्षा आणि त्या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी मुलांच्या संदर्भात असलेला त्यांचा अटट्हास मोठया प्रमाणात दिसुन येतो. अशातच परिवारामध्ये मुलांच्या संदर्भात केवळ आणि केवळ शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यासाचा प्रयत्न करण्यात येतो शिवाय सामान्य परिवारामध्ये मुलांच्या शिक्षणाच्या सोबतच वाढणाऱ्या अन्य कौटुंबिक गरजांची पूर्तता आणि त्यासाठी त्यांना सातत्याने करावे लागणारे कष्ट व त्यासाठी करावा लागणारा त्याग यामधुन परिवारातील कर्त्या व्यक्तीला मोठया प्रमाणात तणावाला सामोरे जावे लागते तेव्हा या तणावाला योग्य प्रकारे नियंत्रित करण्याचा प्रयत्न न केल्यास शिवाय ज्याठिकाणचा तणाव आहे तो त्याच ठिकाणी नियंत्रित केल्यास समस्या निर्माण होत नाही परंतु बहुतांश व्यक्ती आपल्या कामाच्या ठिकाणचा तणाव कुटुंबामध्ये ऊफाळुन येतांना दिसुन येतो. पालक घरी आल्यावर त्यांचा पाल्य त्यांना अभ्यास करतांना न दिसल्यामुळे पालकाकडुन होणारी चिडचिड, मुलाची शैक्षणिक प्रगती अपेक्षेपेक्षा कमी असल्यास त्याला त्याची जाणीव करूण देण्याची प्रवृत्ती शिवाय दुसऱ्या मुलांचे उदाहण देण्याची पालक वर्गाची वृत्ती, घरामधील आई-वडिलांचे भांडणे उत्पन्न खर्चाच्या संदर्भात निर्माण होणारे तणाव या सर्व बाबींचा मुलांवर व त्यांच्या शैक्षणिक सामाजिक व्यक्तिमत्व विषयक विकासावर विपरीत परिणाम होतो. अशा स्थितीत माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक वातावरण कसे आहे याचा अभ्यास वर्तमान दृष्टिकोणातुन करण्यात आलेला आहे.

## संशोधनाची उदिद्ष्टये :

१. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक वातावरणाचा अभ्यास करणे.
२. माध्यमिक स्तरावरील ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक वातावरणाचा अभ्यास करणे.
३. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या कौटुंबिक वातावरणाचा अभ्यास करणे.

## संशोधनाच्या परिकल्पना :

१. माध्यमिक स्तरावरील ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक वातावरणामध्ये सार्थक फरक नाही.
२. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या कौटुंबिक वातावरणामध्ये सार्थक फरक नाही.

## संशोधनाच्या मर्यादा परिमर्यादा :

प्रस्तुत संशोधन कार्य अमरावती विभागातील यवतमाळ जिल्ह्यापुरते मर्यादित असुन या संशोधनामध्ये माध्यमिक स्तरावर इयत्ता ९ वी मध्ये शिकत असलेल्या ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थी व विद्यार्थीनीपुरते हे संशोधन कार्य मर्यादित आहे. या संशोधनामध्ये विद्यार्थ्यांच्या केवळ स्तरनिहाय कौटुंबिक वातावरणाचा अभ्यास करण्यात आलेला आहे शिवाय ग्रामीण व शहरी भागातील मुले व मुलींच्या कौटुंबिक वातावरणाच्या मध्यमानातील फरक अभ्यासण्यात आलेला आहे.

## संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे त्यामध्ये अमरावती विभागातील यवतमाळ या जिल्ह्यातील, इयत्ता नववी मधील अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांशी संबंधित असल्यामुळे सुगम यादृच्छिक न्यादर्श पद्धतीचा अवलंब करण्यात आला. विद्यार्थ्यांना प्रमाणित चाचण्या देऊन माहिती संकलित करुन त्यांचे वर्णनात्मक सर्वेक्षण पद्धतीनुसार अर्थनिर्वचन करावयाचे असल्यामुळे वर्णनात्मक संशोधन पद्धतीची निवड करण्यात आली.

## संशोधनाची जनसंख्या आणि न्यादर्श :

प्रस्तुत संशोधनाकरिता अमरावती विभागातील, यवतमाळ या जिल्ह्यात ५७९ मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा असून माध्यमिक विद्यालयामध्ये शिकत असलेले सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थीनी प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या आहे.

प्रस्तुत संशोधनाच्या जनसंख्येमधुन न्यादर्शाची निवड करण्यासाठी सुगम यादृच्छिक न्यादर्शन प्रविधीचा वापर करण्यात आला आहे त्यामध्ये शहरी व ग्रामीण भागातील मिळून एकूण १० माध्यमिक शाळांची निवड सुगम यादृच्छिक न्यादर्श पद्धतीने करण्यात आली. त्यापैकी प्रत्येक जिल्ह्यातून पाच ग्रामीण व पाच शहरी शाळांची वरील पद्धतीने निवड करण्यात आली आहे. ग्रामीण व शहरी भागातील यादृच्छिक पद्धतीने निवडलेल्या १० शाळांमधून प्रत्येक शाळेतील इयत्ता नववीमधील २० मुले व २० मुली यांची सुगम यादृच्छिक न्यादर्श पद्धतीने निवड करण्यात आली अशाप्रकारे प्रस्तुत संशोधनासाठी यवतमाळ जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील न्यादर्श स्वरूपात निवडलेल्या शाळामधून एकूण ४०० विद्यार्थी व विद्यार्थिनींची न्यादर्श म्हणून निवड करण्यात आली आहे.

**संशोधनाची साधने :**

प्रस्तुत संशोधनामध्ये माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक वातावरणाचा अभ्यास करण्यासाठी बीना शाह यांनी विकसित आणि प्रमाणित केलेल्या कौटुंबिक वातावरण मापणीचा वापर करण्यात आलेला आहे. कौटुंबिक वातावरण प्रश्नावलीमध्ये एकूण ९० प्रश्न आहेत. हे प्रश्न एकूण दहा घटकांत विभागलेले आहेत. प्रत्येक घटकात ९ विधाने आहेत. या प्रश्नावलीत कौटुंबिक वातावरणाचे दहा पैलू आहेत.

**सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन :**

प्रस्तुत संशोधनामध्ये सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यासाठी शेकडेवारी पध्दती, मध्यमान, प्रमाण विचलन आणि टी परिक्षण या सांख्यिकीय प्रविधींचा वापर करण्यात आलेला आहे.

**सारणी क्र १.१**
**माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक वातावरणाचे वितरण दर्शवणारी सारणी.**

| कौटुंबिक वातावरण | ग्रामीण | | शहरी | | मुले | | मुली | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| अतिउच्च | ०९ | ४.५० | १८ | ९.०० | १६ | ८.०० | ११ | ५.५० | ५४ | ६.७५ |
| उच्च | ४२ | २१.०० | ५७ | २८.५० | ४७ | २३.५० | ५२ | २६.०० | १९८ | २४.७५ |
| सामान्य | ८१ | ४०.५० | ६२ | ३१.०० | ७१ | ३५.५० | ७३ | ३६.५० | २८७ | ३५.८८ |
| निम्न | ५२ | २६.०० | ५१ | २५.५० | ५२ | २६.०० | ५० | २५.०० | २०५ | २५.६२ |
| अतिनिम्न | १६ | ८.०० | १२ | ६.०० | १४ | ७.०० | १४ | ७.०० | ५६ | ७.०० |
| **एकुण** | **२००** | **१००** | **२००** | **१००** | **२००** | **१००** | **२००** | **१००** | **८००** | **१००** |

वरिल सारणीमध्ये माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक वातावरणाचे स्तरनिहाय वितरण दर्शवण्यात आलेले आहे. अतिउच्च कौटुंबिक वातावरणाच्या बाबतीत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सहभागीतेचे प्रमाण ४.५० % आहे तर शहरी भागातील विद्यार्थ्यांचे अतिउच्च कौटुंबिक वातावरणामध्ये असलेल्या सहभागीतेचे प्रमाण ९.००% आहे. अतिउच्च कौटुंबिक वातावरण स्तरामध्ये सहभागी असलेल्या सर्वेक्षीत मुलांचे प्रमाण ८.००% आहे तर अतिउच्च कौटुंबिक वातावरणामध्ये सहभागी असलेल्या मुलींचे प्रमाण ५.५०% आहे. तसेच एकुण सर्वेक्षीत विद्यार्थ्यांपैकी ६.७५% विद्यार्थी अतिउच्च कौटुंबिक वातावरण स्तरामध्ये सहभागी आहेत. यावरूण स्पष्ट होते की, अतिउच्च कौटुंबिक वातावरणाच्या स्तरामध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत शहरी भागातील विद्यार्थी सर्वाधिक सहभागी झालेले आहेत तसेच माध्यमिक स्तरावरील सर्वाधिक मुले मुलींच्या तुलनेत अतिउच्च कौटुंबिक वातावरण स्तरामध्ये समाविष्ट आहेत.

उच्च कौटुंबिक वातावरणाच्या बाबतीत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सहभागीतेचे प्रमाण २१.०% आहे तर शहरी भागातील विद्यार्थ्यांचे उच्च कौटुंबिक वातावरणामध्ये असलेल्या सहभागीतेचे प्रमाण २८.५०% आहे. उच्च कौटुंबिक वातावरण स्तरामध्ये सहभागी असलेल्या सर्वेक्षीत मुलांचे प्रमाण २३.५०% आहे तर उच्च कौटुंबिक वातावरणामध्ये सहभागी असलेल्या मुलींचे प्रमाण २६.००% आहे. तसेच उच्च कौटुंबिक वातावरण स्तरामध्ये सहभागी असलेल्या सर्वेक्षीत विद्यार्थ्यांचे प्रमाण २४.७५% आहे. यावरून स्पष्ट होते की, उच्च कौटुंबिक वातावरणाच्या स्तरामध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत शहरी भागातील विद्यार्थी सर्वाधिक सहभागी झालेले आहेत तसेच माध्यमिक स्तरावरील सर्वाधिक मुली, मुलांच्या तुलनेत अतिउच्च कौटुंबिक वातावरण स्तरामध्ये समाविष्ट आहेत.

सामान्य कौटुंबिक वातावरणाच्या बाबतीत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सहभागीतेचे प्रमाण ४०.५० % आहे तर शहरी भागातील विद्यार्थ्यांचे सामान्य कौटुंबिक वातावरणामध्ये असलेल्या सहभागीतेचे प्रमाण ३१.००% आहे. सामान्य कौटुंबिक वातावरण स्तरामध्ये सहभागी असलेल्या सर्वेक्षीत मुलांचे प्रमाण ३५.५०% आहे तर सामान्य कौटुंबिक वातावरणामध्ये सहभागी असलेल्या मुलींचे प्रमाण ३६.५०% आहे.

तसेच सामान्य कौटुंबिक वातावरण स्तरामध्ये सहभागी असलेल्या सर्वेक्षीत विद्यार्थ्यांचे प्रमाण ३५.८८% आहे. यावरून स्पष्ट होते की, सामान्य कौटुंबिक वातावरणाच्या स्तरामध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत शहरी भागातील विद्यार्थी सर्वाधिक सहभागी झालेले आहेत तसेच माध्यमिक स्तरावरील सर्वाधिक मुली, मुलांच्या तुलनेत सामान्य कौटुंबिक वातावरण स्तरामध्ये समाविष्ट आहेत.

निम्न कौटुंबिक वातावरणाच्या बाबतीत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सहभागीतेचे प्रमाण २६.००% आहे तर शहरी भागातील विद्यार्थ्यांचे निम्न कौटुंबिक वातावरणामध्ये असलेल्या सहभागीतेचे प्रमाण २५.५०% आहे. निम्न कौटुंबिक वातावरण स्तरामध्ये सहभागी असलेल्या सर्वेक्षीत मुलांचे प्रमाण २६.००% आहे तर निम्न कौटुंबिक वातावरणामध्ये सहभागी असलेल्या मुलींचे प्रमाण २५.००% आहे. तसेच निम्न कौटुंबिक वातावरण स्तरामध्ये सहभागी असलेल्या सर्वेक्षीत विद्यार्थ्यांचे प्रमाण २५.६२% आहे. यावरूण स्पष्ट होते की, निम्न कौटुंबिक वातावरणाच्या स्तरामध्ये शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत ग्रामीण भागातील विद्यार्थी सर्वाधिक सहभागी झालेले आहेत तसेच माध्यमिक स्तरावरील सर्वाधिक मुले, मुलीच्या तुलनेत निम्न कौटुंबिक वातावरण स्तरामध्ये समाविष्ट आहेत.

अतिनिम्न कौटुंबिक वातावरणाच्या बाबतीत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सहभागीतेचे प्रमाण ८.०० % आहे तर शहरी भागातील विद्यार्थ्यांचे अतिनिम्न कौटुंबिक वातावरणामध्ये असलेल्या सहभागीतेचे प्रमाण ६.००% आहे. अतिनिम्न कौटुंबिक वातावरण स्तरामध्ये सहभागी असलेल्या सर्वेक्षीत मुलांचे प्रमाण ७.००% आहे तर अतिनिम्न कौटुंबिक वातावरणामध्ये सहभागी असलेल्या मुलींचे प्रमाण ७.००% आहे. तसेच अतिनिम्न कौटुंबिक वातावरण स्तरामध्ये सहभागी असलेल्या सर्वेक्षीत विद्यार्थ्यांचे प्रमाण ७.००% आहे. यावरूण स्पष्ट होते की, अतिनिम्न कौटुंबिक वातावरणाच्या स्तरामध्ये शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत ग्रामीण भागातील विद्यार्थी सर्वाधिक सहभागी झालेले आहेत

**सारणी क्र. १.२**

**माध्यमिक स्तरावर शिकत असलेले ग्रामीण विद्यार्थी आणि शहरी विद्यार्थी यांच्या कौटुंबिक वातावरणाच्या मध्यमानाची तुलना दर्शविणारी सारणी**

| चल | विद्यार्थी संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | स्वाधीनता मात्रा | मध्यमानातील फरकाची प्रमाण तृटी | प्राप्त 'टी' मूल्य. | सारणी 'टी' मूल्य | सार्थकता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ग्रामीण विद्यार्थी | २०० | १०६.४२ | १३.५५८ | ३९८ | ०.९२७ | ३.००** | १.९६ | सार्थक आहे |
| शहरी विद्यार्थी | २०० | १०९.२१ | १४.५९४ | | | | | |
| सर्वेक्षीत मुली | २०० | १०७.०७ | १४.२४५ | ३९८ | ०.९३३ | ०.५१४ | १.९६ | सार्थक नाही |
| सर्वेक्षीत मुले | २०० | १०७.५५ | १४.१४२ | | | | | |

वरील सारणी क्र.१.२ वरून असे निदर्शनास येते की, ग्रामीण आणि शहरी भागातील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक वातावरणाचे मध्यमान अनुक्रमे १०६.४२ आणि १०९.२१ आहे. प्रमाण विचलन अनुक्रमे १३.५५८ व १४.५९४ आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक वातावरणाच्या मध्यमानातील फरक २.७९ आहे. स्वाधीनता मात्रा ३९८ करिता ०.०१ सार्थकता स्तरावर सारणी मूल्य १.९६ आहे प्राप्त टी मुल्य ०.०१ सार्थकता स्तरावर अपेक्षीत सारणी मुल्यापेक्षा जास्त आहे याचा अर्थ असा की माध्यमिक स्तरावर शिकत असलेले ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक वातावरणाच्या मध्यमानामध्ये सार्थक फरक आहे. त्यामध्ये शहरी भागातील विद्यार्थ्यांचे कौटुंबिक वातावरण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक वातावरणाच्या तुलनेत पोषक असल्याचे दिसुन येते.

वरील सारणी क्र.१.२ वरून असे निदर्शनास येते की, सर्वेक्षीत माध्यमिक स्तरावर शिकत असलेले एकूण मुली आणि मुलांच्या कौटुंबिक वातावरणाचे मध्यमान अनुक्रमे १०७.०७आणि १०७.५५आहे. प्रमाण विचलन अनुक्रमे १४.२४५ आणि १४.१४२ आहे. माध्यमिक स्तरावर शिकत असलेल्या सर्वेक्षीत मुले आणि मुलींच्या मध्यमानातील फरक ०.१०३आहे. स्वाधीनता मात्रा ३९८ करिता ०.०५ सार्थकता स्तरावर अपेक्षीत सारणी मुल्य १.९६ आहे प्राप्त टी मुल्य अपेक्षीत सारणी मुल्यापेक्षा कमी असल्याचे स्पष्ट होते याचा अर्थ असा की, माध्यमिक स्तरावर शिकत असलेले सर्वेक्षीत मुले आणि मुलींच्या कौटुंबिक वातावरणामध्ये सार्थक फरक दिसुन येत नाही. म्हणजे मुले आणि मुलींचे कौटुंबिक वातावरणाचे प्रमाण जवळपास सारखे आहे.

**संशोधनाचे निष्कर्ष :**

१. अतिउच्च कौटुंबिक वातावरणाच्या स्तरामध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत शहरी भागातील विद्यार्थी सर्वाधिक सहभागी झालेले आहेत तसेच माध्यमिक स्तरावरील सर्वाधिक मुले मुलींच्या तुलनेत अतिउच्च कौटुंबिक वातावरण स्तरामध्ये समाविष्ट आहेत.
२. उच्च कौटुंबिक वातावरणाच्या स्तरामध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत शहरी भागातील विद्यार्थी सर्वाधिक सहभागी झालेले आहेत तसेच माध्यमिक स्तरावरील सर्वाधिक मुली, मुलांच्या तुलनेत अतिउच्च कौटुंबिक वातावरण स्तरामध्ये समाविष्ट आहेत.
३. सामान्य कौटुंबिक वातावरणाच्या स्तरामध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत शहरी भागातील विद्यार्थी सर्वाधिक सहभागी झालेले आहेत तसेच माध्यमिक स्तरावरील सर्वाधिक मुली, मुलांच्या तुलनेत सामान्य कौटुंबिक वातावरण स्तरामध्ये समाविष्ट आहेत.
४. निम्न कौटुंबिक वातावरणाच्या स्तरामध्ये शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत ग्रामीण भागातील विद्यार्थी सर्वाधिक सहभागी झालेले आहेत तसेच माध्यमिक स्तरावरील सर्वाधिक मुले, मुलीच्या तुलनेत निम्न कौटुंबिक वातावरण स्तरामध्ये समाविष्ट आहेत.
५. अतिनिम्न कौटुंबिक वातावरणाच्या स्तरामध्ये शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत ग्रामीण भागातील विद्यार्थी सर्वाधिक सहभागी झालेले आहेत तसेच माध्यमिक स्तरावरील सर्वाधिक मुली, मुलांच्या तुलनेत अतिनिम्न कौटुंबिक वातावरण स्तरामध्ये समाविष्ट आहेत.
६. शहरी भागातील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचे कौटुंबिक वातावरण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत अधिक पोषक आहे.
७. माध्यमिक स्तरावरील मुले व मुलांच्या कौटुंबिक वातावरणामध्ये फरक दिसुन येत नाही म्हणजे त्यांचे कौटुंबिक वातावरण जवळपास सारखे आहे.

**संशोधनाचे शैक्षणिक उपयोजन :**

मुलांना समजुन घेण्याची वृत्ती पालक वर्गामध्ये निर्माण झाली पाहीजे. अतिमोठया अपेक्षा ज्या मुलांच्या क्षमतेच्या पलीकडे आहे त्याचा अटटाहास नसला पाहीजे. कुटुंबामधील परस्परांमध्ये प्रेम, आपुलकी व जिव्हाळयाचे नाते संबंध निर्माण करण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत कितीही तणाव निर्माण झाला तरी त्याचे योग्य प्रकारे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. त्याचा कुटुंबाचे वातावरणावर विपरीत प्रभाव पडणार नाही याची दक्षता घेण्याची गरज आहे. दिवसेंदिवस विभक्त कुटुंबाचे प्रमाण वाढते आहे आणि त्याचा परिणाम कौटुंबीक ताण-तणाव वाढण्यावर होऊन कौटुंबिक वातावरण चांगले राहत नाही त्यासाठी संयुक्त कुटुंब पध्दतीचा स्विकार नव्या स्वरूपात होण्याची नितांत गरज आहे. कुटुंबामध्ये मुलांच्या संदर्भात आणि आपल्या संस्कृतीच्या बाबतीत शिस्त असावी परंतु या शिस्तीचे रूपांतर कठोर आज्ञा आणि नियमामध्ये होता कामा नये. परिवारातील व्यक्तींना कुटुंबामध्ये सुरक्षीतता वाटली पाहीज कितीही मोठे संकट आले तरी कुटुंबातील व्यक्ती आपल्याला मदत करतील असा आत्मविश्वास निर्माण होऊ शकेल असे परस्पर संबंध कुटुंबामध्ये निर्माण होणे गरजेचे आहे. नवविचार मुल्य आणि संस्कृतीचे अनुकरण करतांना त्याचा विपरील परिणाम आपल्या कुटुंबावर होणार नाही त्याची दक्षता घ्यावी केवळ अन्य व्यक्ती तसे करतात म्हणून आपण सुध्दा त्यांच नव विचाराचा कोणाताही विचार न करता अवलंब करण्यात यावा हे पोषक कौटुंबिक वातावरणासाठी धोक्याची घंटा आहे. कुटुंबामध्ये मुलांच्या शैक्षणिक विकासाला खेळीमेळीच्या वातावरणातुन विकसित करण्यात यावे शिवाय मुलांमधील विविध क्षमता काय आहे याचा विचार करण्यात यावा त्यांच्या अडचणी जाणुन घेण्यात यावा केवळ विद्यार्थ्यांना परिक्षेमध्ये प्राप्त झालेल्या गुणांना अतिमहत्व न देता त्यांच्या सर्वांगीण विकासाकडे कुटुंबाकडुन लक्ष दिले पाहीजे व त्यासाठी आवश्यक कौटुंबिक वातावरण प्रत्येक व्यक्तीच्या परिवारामध्ये निर्माण होणे आजच्या धकाधकीच्या काळामध्ये गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथ सुची -**


- अहेर, हिरा,(1995), ***उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षकः*** श्री.विद्या प्रकाशन, पुणे
- जाधव, एम.एल, आर.आर.माने, (2009), ***शालेय व्यवस्थापन :*** फडके प्रकाशन, पुणे आवृत्ती 8
- घोरमोडे, के.यु., के.के.घोरमोडे (2008) ***शैक्षणिक संशोधनाची मुलतत्त्वेः*** विद्या प्रकाशन, नागपूर
- घाटोळे, रा.ना. (2004) ***समाजशास्त्रीय संशोधन तत्त्वे व पद्धती:*** मंगेश प्रकाशन, नागपूर
- Beena Shah, ***Manual for Family Climate Scale:*** FCS, National Psychological Corporation, Agra.
- Best,J.W. and Kahn, J.V. (1996), ***Research in Education (7th Ed.):*** Perntice Hall of India, New Delhi